दिनांक : २५.०३.२०११

## जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड

विषय : नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत, स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबीराचे आयोजन.

संदर्भ : १) जा.क्र.नियोजन/जिवायो /का ४/२०१०-११/५२८दिनांक ०६/०८/२०१०
२) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग पत्र क्रमांक डिएपी -१०१०/प्रक्र-२१६ का-१४८१, दिनांक ०६/१२/२०१०
३) जा.क्र.नियोजन/नपुयो/का.४/१/०२/२०११/१५२७दिनांक २४/०१/२०११

महाराष्ट्र शासना मार्फत नव्यानेच राबविण्यात येत असलेल्या नाविन्यपुर्ण योजने अंर्तगत, शासनाच्या नियमित तरतुदी शिवाय, वेगळी तरतूद ठेवून, त्याची अंमलबजावणी करण्याबाबतचा मानस, मा.जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केला होता. त्यामध्ये, जिल्हयातील नाविन्यपुर्ण कामे, या माध्यमातून करावीत असे नियोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ग्रामीण भागात औद्योगिकरण वाढावे व उद्योजगतेचा प्रसार प्रचार व्हावा, यासाठी जिल्हयातील युवक युवती साठी स्वंयरोजगार प्रशिक्षण शिबीर घेवून स्वंयरोजगाराच्या माध्यमातुन, जिल्हयाचा आद्यौगीक विकास साधला जावा हा या योजने मागचा उद्देश आहे.

ही योजना राबवितानां, मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सनियत्रंण समीतीची स्थापना करण्यात आली. योजनेचे स्वरुप ठरवण्यात आले. त्यामध्ये दोन दिवसीय शिबीर घेवून त्या शिबीरात कमीत कमी ५००० युवक युवतींची उपस्थिती अपेक्षित असून, त्यांना कृषिपूरक उद्योगसंधी व विविध स्वंयरोजगार योजनांची माहिती देण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी जिल्हयात खालील ठिकाण शिबीर घेण्याचे ठरविण्यात आले.
१. नांदेड तालुका, २. देगलूर तालुका, ३. मुखेड तालुका, ४. अर्धापूर तालुका, ५. मुदखेड तालुका. त्याप्रमाणे शिबीर घेण्यासाठी, संस्था निवडीकरिता, दिनांक २३ ऑगस्ट २०१० रोजी वर्तमान पत्रातुन जाहीरात देण्यात आली. त्यानंतर प्राप्त निवीदा मधुन, समितीने ठरविलेल्या, निकषास पात्र स्वंयसेवी सस्थांची निवड करण्यात आली. प्रत्येक शिबीरासाठी रु. ७.५५ लाख एवढी रक्कम कमीत कमी दर भरलेल्या निविदेनुसार निश्चित करण्यात आली. त्यामध्ये खालीलप्रमाणे कामाचे स्वरुप व दर ठरविण्यात आले.

नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत, स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबीरासाठी (एका प्रशिक्षण शिबीरा करीता)
कामाचे स्वरुप व दर

| गाव निहाय सभा घेणे (अंदाजे ६० गावा करीता) | शिबीरा साठी मंडप उभारणी दोन दिवसा करीता (अदांजे ५००० प्रशिक्षणार्थी साठी) | स्वागत समारोह खर्च | प्रशिक्षाणार्थीना साहित्य वाटप (अदांजे ५००० प्रशिक्षणार्थी साठी) | भोजन व चहापाण व्यवस्था खर्च (अदांजे ५००० प्रशिक्षणार्थी साठी) | एकुण खर्च (एका प्रशिक्षण शिबीरा करीता) |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ३०,०००/ | २,००,०००/- | १,००,०००/- | २,५०,०००/- | १,७५,०००/ | ७,५५,०००/- |

संस्थांचे सनियत्रंण समीती समोर प्रेझेंटेशन घेण्यात आले. त्या मध्ये एकुण पाच निवीदा प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी चार सस्थांच्या प्रस्तावाना सनियत्रंण समीतीने मान्यता दिली. त्या नुसार पात्र संस्थाना कार्यक्रमाचे वाटप तालुकानिहाय करण्यात आले.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | तालुका | शिबीर घेतल्याचा दिनांक | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | मे. सिध्दी विनायक ग्रुप अमरावती | मुखेड<br>नांदेड | २९,३० जाने.२०११<br>१२,१३ मार्च,२०११ | ८४१०<br>७४०७ |
| २ | मिटकॉन प्रा.लि.पुणे | देगलूर | ११ व१२ मार्च,११ | १५०० |

काही तांत्रिक अडचणीमुळे, अर्धापूर येथे, गाईडन्स ॲन्ड ट्रेनिंग इस्टीटयुट नांदेड यांच्यातर्फे होणारे व चक्रधर ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, नांदेड यांच्यामार्फत मुदखेड येथे होणारे शिबीर घेणे शक्य झाले नाही.

या साठी रक्कम रुपये ४०.००लाख तरतुद प्राप्त झाली होती. त्या पैकी रक्कम रुपये १९.८६ लाख एव्हढी तरतुद जिल्हाधिकारी कार्यालयास परत करण्यात आली.

प्र.महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नांदेड.